# युवकांच्या मनगटामध्ये प्रचंड ताकद पण ती योग्य वेळी ओळखणे गरजेचे - युवा व्याख्याते प्रथमेश इंदुलकर

योग्य मार्गदर्शनाच्या अभावामुळे आजचा युवक नशेच्या आहारी जात आहे. आई-वडिलांचे संस्कार व वाचनाची सवय विद्यार्थ्यांमध्ये कमी होत चालली आहे तसेच मोबाईल वापराचे वाढते प्रमाण, सोशल मीडिया आणि रिल्स यामध्ये आपल्या आयुष्यामधील बहुमूल्य वेळ खर्च करत असल्यामुळे आजचा युवक सशक्त असून त्याच्यामध्ये प्रचंड ऊर्जा असून देखील यश संपादन करण्यामध्ये अपयशी ठरत आहेत. विद्यार्थ्यांच्या मनगटामध्ये प्रचंड ताकद आहे पण ती योग्य वेळीच ओळखणे आणि योग्य दिशेने वाटचाल करणे गरजेचे आहे असे उपदेशात्मक विधान युवा वक्ते प्रथमेश इंदुलकर यांनी केले. श्री व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी येथे आयोजित 'युवकांचे आचार-विचार व व्यक्तिमत्व घडवणारी मूल्ये' या विषयावर आयोजित कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज या थोर व्यक्तींच्या जीवन चरित्रातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी संस्कार रुजविणे गरजेचे आहे. ज्ञानेश्वरांनी सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहिली तसेच छत्रपती शिवाजी महाराजांनी वयाच्या सोळाव्या वर्षी स्वराज्य स्थापनेसाठी प्रयत्न सुरू केले. युवकांनी तारुण्याच्या वयात मोठी स्वप्ने पाहणे आणि ते पूर्ण करण्यासाठी सतत कार्यरत असणे, त्यासाठी चांगले मित्र जवळ करणे गरजेचे आहे पण त्याहूनही अधिक महत्त्वाचे आहे ते म्हणजे विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांनी, शिक्षकांनी दिलेले संस्कार अंगीकरून यशासाठीची वाटचाल करणे. विद्यार्थ्यांच्या अंगी असणारे संस्कार हे विद्यार्थ्यांच्या यशामध्ये मोलाचा वाटा देत असतात त्यामुळे आपल्या कामावर, आपल्या ईश्वरावर श्रद्धा ठेवून प्रत्येक कार्य करणे गरजेचे आहे असे ते म्हणाले. संस्कारक्षम पिढी घडवण्याची जबाबदारी ही युवकांची आहे युवकांनी दैनंदिन जीवनामध्ये आपल्या सभोवतालच्या परिस्थितीतून, वातावरणातून चांगले संस्कार आपल्यामध्ये रुजवणे गरजेचे असून चरित्र संपन्न व्यक्तिमत्त्व स्वतः घडविणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये कमी होत चाललेली संस्कार व मूल्ये, करिअर प्रवासामध्ये संस्काराचे महत्त्व समजून देणे हा उद्देश नजरेसमोर ठेवून आजच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून ज्याचा लाभ विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी झाल्यास कार्यक्रम आयोजन करण्याचे सार्थक झाले असे म्हणता येईल असे मत आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस डॉ. बी. एन. कांबळे यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख व प्रास्ताविक करून दिले तर कार्यक्रमाच्या सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शनाची जबाबदारी अनुक्रमे मोहिनी अंचलिया आणि तालीब मुल्ला यांनी पार पाडले.

सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक प्राध्यापक तर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली.

